ISBN-978-81-932125-2-3

Special Issue
International
Women's Day
8th March 2016

राष्ट्र उभारणीत महिलांचे योगदान

Women's Contribution in Nation Building

(An Interdisciplinary Approach)

AKSHARWELL PRAKASHAN

-संपादक-
डॉ.पांडुरंग बर्वे

-कार्यकारी संपादक-
डॉ.शारदा कदम

Printed by :
Mohan Offset Printers, Mahavir Nagar, Purna Dist. Parbhani

Cover Designed by :
Sanjay Rautre, Purna Dist. Parbhani.

Published by :
Aksharwell Prakashan,
Shikshak Colony, Eakbal Nagar, Purna-431511 Dist.Parbhani (M.S.)
Mob. : 9158585277
E-mail : aksharwellprakashan@gmail.com

ISBN : 978-81-932125-2-3

Disclaimer : The author are solely responsible for the content of the papers complied in this volume. The publisher, editor or editor do not take responsibility for the same in any manner error if any purely unintentional and renders are requested to communicate such error to the editor or publisher to avoid discrepancies in future.

© **Editors**

First Edition : 8 March 2016

अनु	लेखाचे शिर्षक	लेखकाचे नाव	पान क्र.
23	महिला सक्षमीकरणामध्ये बचत गटाची भूमिका	प्रा.चित्रा बापुराव चांदुरकर श्रीमती ज्योती सुनिलसिंग तोमर	114
24	मराठी साहित्यामध्ये महिला लेखिकांचे योगदान	प्रा. डॉ. जगतयाड शिवाजी पिराजी	118
25	स्वातंत्र्य लढयात महिलांचे योगदान -झाशीच्या राणी लक्ष्मीबाई	प्रा.अनिल प्रभाकर निकम	121
26	समाज प्रबोधनातून राष्ट्र उभारणीत महिला संतांचे योगदान : एक चिंतन	प्रा.सौ.सारीका विवेक श्रावणे	124
27	मराठी साहित्यामध्ये महिलांचे योगदान	प्रा. अनुप अरुण नांदगावकर	128
28	"स्त्रीवादी वाङ्मय प्रवाहामधील मराठी लेखिकांचे योगदान" प्रा. डॉ. सौ. दीपा यशवंत कुलकर्णी	प्रा. डॉ. सौ. दीपा यशवंत कुलकर्णी	131
29	उच्च शिक्षणामध्ये स्त्रियांचे योगदान	डॉ. सुजाता जगन कराडे	137
30	महिलांसाठीचे कायदे	प्रा. जी.एस.कुबडे	143
31	भारतीय स्त्रिया व कायद्याचे संरक्षण	संदीप एकनाथ गोस्वामी	146
32	महिला संतांचे योगदान	प्रा.डॉ.चिश्ती ए.एम.	151
33	महिला सक्षमीकरणामध्ये गृहविज्ञान विषयाचे योगदान	प्रा. बबीता अ. हजारे	157
34	विविध क्षेत्रात महीलांचे योगदान	प्रा.मारोती उध्दवराव टिपले	160
35	महिला सक्षमीकरणात कायद्यांची भूमिका	प्रा.पेरके वैशाली शेषराव	164
36	महिलांच्या सक्षमीकरणात महिला आर्थिक विकास महामंडळाची भूमिका - एक अध्ययन	प्रा. मंगला बनसोड	168
37	बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक सक्षमीकरण	प्रा. चामे हरिश्चंद्र व्यंकटराव	172
38	महिलांचे सामाजिक चळवळीतील योगदान	प्रा.आर.एस.डाखोरे	176
39	स्वयंसहाय्यता बचत गटाचे व्यवस्थापन	डॉ. अनिल नारायन पाटील	179
40	मराठी साहत्यिामध्ये महिला लेखिकांचे योगदान	प्रा. बाळासाहेब द पौळ	186
41	महिला बचत गट व ग्रामिण विकास	व्हि. व्हि. खांडेकर	188
42	महिला सक्षमिकरण व बचत गट	प्रा. प्रमोद सी. वानखेडे	193
43	महिला बचत गट	डॉ जयमाला एल रामटेके	197
44	विविध क्षेत्रात महीलांचे योगदान	प्रा.डॉ.जयश्री विश्राम कुळकर्णी प्रा.क ओ. जिरापुरे	200
45	" महाराष्ट्रातील ग्रामिण महिलांच्या आर्थिक विकासात महिला बचत गटांचे योगदान "	प्रा.विजय प्र.जाधव	205
46	ग्रंथनिर्मितीमध्ये महिलांचे योगदान	प्रा.कु. कविता मु. इंगळे	209

 ISBN-978-81-932125-2-3

30

महिलांसाठीचे कायदे

प्रा. जी.एस.कुबडे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख-मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय,वाशिम

सारांश :-

सृष्टीची निर्मितीअनेक सजीव - निर्जिव गोष्टी पासुन झालेली आहे. त्यामध्ये सृष्टीचा समतोल राखला जावा या दृष्टीने मानव वंश विकास प्रक्रिया निर्मीकाने भिन्न लिंग व भिन्न गुणधर्म असलेल्या परंतू एकमेकास पूरक असलेल्या स्त्री - व पूरूषांची निर्मिती केली स्त्रि व पूरूष आपआपल्या परीने जीवन जगण्यास बलवान व सक्षम आहेत असे असले तरी सनातन भारतीय पुरूष सत्ताक संस्कृतीने स्त्रि पूरूषापेक्षा वरचढ होऊ नये यासाठी धर्मशास्त्राचा आधार घेऊन तिला दासी म्हणून राबविण्यात याव, जनावरापेक्षाही ही न दर्जा द्यावा तसेच ती कायम पुरूषांच्या अकित राहावी यासाठी तिला शारीरिक - मानसिक बंधनांनी बंदिस्त केले होते त्यामध्ये अनिष्ठ रुढी परंपरा, कर्मकांड, अंधश्रध्दा, दागदागिने हया सर्व गोष्टी तीच्यावर लागण्यात आल्या होत्या यामधून तिला मूक्ती मिळण्यासाठी पर्यंत्न करणे आवश्यक होते.

प्रस्तावना :-

स्त्री / पुरूष समानतेचे तत्त्व भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेतच ग्रथित करण्यात आले आहे. भारतीय संविधान महिलांना फक्त समानताच मान्य करत नाही तर महिलांबाबतची सापत्नता कमी करण्यासाठी विविध योजना अंगिक ारण्यासाठी राज्यांना अधिकारही देते. तरीही, स्त्री-पुरूष भेद विविध स्वरुपात दिसुन येतो. गेल्या काही दशकांतील लोक संख्येतील घटत्या स्त्री- पुरूष प्रमाणावरुन (महाराष्ट्रात १९८१ मध्ये ९३७, १९९१ मध्ये ९३४, २००१ मध्ये ९२२ आणि २०११ मध्ये ९२५) हे प्रकर्षाने दिसून येते. सामाजिक रुढींचा पगडा आणि कौटुंबिक तथा सामाजिक स्तरावरील हिंसा ही सापत्नभावाची काही उदाहरणे आहेत. स्त्री/पुरूष असमानतेची कारणे ही सामाजिक व आर्थिक संरचनेशी निगडित आहेत. परिणामतः महिलांना, त्यातही मुख्यत्वेकरून दुर्लक्षित घटकांतील महिलांना, शिक्षण, आरोग्य व उत्पादनक्षम साधने तसेच इतर गोष्टी पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाहीत. महिलांच्या सर्वांगिन विकासासाठी शासन स्तरावर निर्माण करण्यात आलेले काही कायदे पूढील प्रमाणे आहेत

महिलांशी संबधित कायदे :-

हिंदू विधवा पुनर्विवाह कायदा १८५६, धर्मांतरित व्यक्ती विवाह विच्छेद कायदा १८६६, भारतीय घटस्फोट कायदा १८६९, भारतीय ख्रिस्तीविवाह कायदा १८७२, आनंद विवाह कायदा १९२९, बालविवाह प्रतिबंधक कायदा १९२९ (२००६), पारसी विवाह व घटस्फोट कायदा १९३६, आर्य विवाह विधिवत कायदा १९३७, वेतन प्रदान कायदा १९३६,किमान वेतन कायदा १९४८, समान वेतन कायदाद १९७६, कारखाने कायदा १९४८, खाण कायदा १९५२, करार मजूर (नियोजन व निर्मूलन) कायदा १९७०, राज्य कामगार विमा कायदा १९५१, शेती -मळा लागवड कामगार कायदा १९५१, विशेष विवाह कायदा १९५४, नागरी अधिकारांच्या संरक्षणासंबंधीचा कायदा १९५५, हिंदू विवाह कायदा १९५५, अनैतिक (देह) व्यापार प्रतिबंधक कायदा १९५६, हिंदू उत्तराधिकार (वारस) कायदा १९५६, हिंदू अज्ञानतत्व व पालकत्व व कायदा १९५६, हिंदु दत्तक व निर्वाह कायदा १९५६, विवाहित स्त्रियांचा संपत्तीचा कायदा १९५९, अनाथालये व धर्मदाय गृहांसाठीचा कायदा १९६०, मातृत्व लाभासंबधीचा कायदा १९६१, हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१, विदेश विवाह कायदा १९६९, कुटुंब न्यायालये कायदा १९८४, मुस्लिम स्त्री (घटस्फोट हक्क संरक्षण) कायदा १९८६, स्त्रियांचे अश्लील प्रदर्शन प्रतिबंधक कायदा १९८६, सती प्रथा प्रतिबंध कायदा १९८७, विधी सेवा प्राधिकरण कायदा १९८७, राष्ट्रीय महिला आयोग कायदा १९९०, मानवी हक्क संरक्षण कायदा १९९३, लिंगनिदान साधन (प्रतिबंधक) कायदा १९९४, बाल न्याय कायदा २०००, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा २००५, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००६, मुस्लिम विवाह कायदा, मुस्लिम स्त्रियांचा मालमत्ता व

वारसा हक्काचा कायदा, ख्रिश्चन स्त्रियांचे मालमत्ता व वारसा हक्क, पारसी स्त्रियांचे मालमत्ता व वारसा हक्क, फौजदारी कायदे, भारतीय दंडविधान कायद्यातील कलमे, देवदासी प्रतिबंधक कायदा.

महाराष्ट्र व महिला विकास धोरण :-

१९९४ मध्ये महिला धोरण तयार करणारे महाराष्ट्र हे भारतीतील पहिले राज्य ठरले असून हे धोरण २००१ मध्ये सुधारित करण्यात आले आहे. महिलांचा विकास व सक्षमीकरण घडवून आणणे हे या धोरणाचे मुख्य ध्येय असून प्रमूख उदिष्टे पुढीप्रमाणे आहेत.

- महिलांचा विचार करुन कृषी व ग्रामीण विकासासंबंधित कार्यक्रम आखण.
- शासकीय, निमशासकीय व शासनाचे अनुदान मिळणाऱ्या सर्व संस्थामध्ये महिलांना केंद्रस्थानी ठेवून अर्थसंकल्प आखणे.
- महिलांच्या सक्षमीकरणासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देणे.
- स्वसहाय्यित गटांच्या माध्यमातून आर्थिक विकास साधणे.

महिला आर्थिक विकास महामंडळ :-

राज्य शासनाने २४ फेब्रवारी १९७५ मध्ये महिला आर्थिक विकास महामंडळाची (माविम) स्थापना केली असून केंद्र आणि राज्य सरकार पुरस्कुत विविध विकासात्मक योजनांकरीता ते शिखर संस्था म्हणून कार्य करते. तसेच, स्वसहाय्यित गट, वित्तिय संस्था, स्वयंसेवी संस्था आणि शासनाचे संबधित विभाग यांमधील समन्वयक संस्था म्हणूनही काम करते. माविमची उदिष्टे पूढीलप्रमाणे आहेत.

- महिलांचे संघटन करणे
- महिलांच्या क्षमता विकसित करणे
- महिलांमध्ये आत्मविश्वास वाढविणे.
- महिलांमधील उद्योजकता विकासास मदत करणे.
- रोजगाराच्या संधी व बाजारपेठांची गरज हयांची सांगड घालणे.
- शिक्षण आणि सत्तेत महिलांचा सहभाग वाढवणे

महिला सक्षमीकरण हा निव्वळ एखादा प्रकल्प किंवा कार्यक्रम नसून ती एक प्रक्रिया आहे. स्त्री ही खऱ्या अर्थाने सक्षम झाली असे तेव्हाच म्हणता येईल, जेव्हा ती स्वत:साठी किंवा स्वत:च्या कुटुंबासाठी नियोजन आखून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी योग्य निर्णय घेऊन तिने अपेक्षिलेली उदिष्टे साध्य करू शकेल. महिला सक्षमीकरणामध्ये स्वयहाय्यित गट अत्यंत महत्वाची भूमिका बजावतात. मार्च, २००९ अखेर १३,०३६ गावांमधील ६.२९ लाख महिला ५१,७९३ स्वसहाय्यित गटांमध्ये सहभागी झाल्या होत्या. या महिलांची एकूण वचत ९४.४९ कोटी रुपये इतकी होती आणि एकूण अंतर्गत कर्ज २६७.३० कोटी रुपये इतके होते. रमाई महिला सक्षमीकरण योजना, कृषी सप्तक योजना, महिला स्वावलंबन निधी आणि स्वयंसिध्दा योजना यांसारख्या अनेक योजना महिलांच्या सक्षमीकरणासाठी माविमकडून राबविल्या जातात.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग :-

स्त्रियांवरील अन्यायाचे निराकरण होऊन त्यांना विकासांची संधी उपलब्ध व्हावी यासाठी केंद्र व राज्य शासनाने नविन **धोरणे ठरविली, नवे** कायदे केले. या कायद्यांची चांगल्या प्रकारे व परिणामकारक रीतीने अंमलबजावणी व्हावी, महिलांचा सामाजिक दर्जा उंचावून त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळावी यासाठी महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनाच्या राष्ट्रीय महिला आयोगाप्रमाणे राज्य महिला आयोगाची दि. २५ एप्रिल १९९३ रोजी स्थापना केली. हा आयोग एक स्वायत्त संस्था असून या आयोगाची कार्यकक्षा खालीलप्रमाणे आहे-

१) महिलांच्या संरक्षणात्मक कायद्याचा भंग झाल्यास योग्य त्या न्यायाधिकरणाकडे तक्रार दाखल करणे. न्यायालये, लोकन्यायालयांमध्ये उपस्थित राहून मत मांडणे.

२) गरीब, पीडित स्त्रियांना त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचाराविरूध्द लढा देता यावा यासाठी मोफत सल्ला व मार्गदर्शन पुरविणे.

३) स्त्री अत्याचाराच्या खटल्यांवर लक्ष ठेवून त्यांची चौकशी करणे. तसेच पोलीस कारवाईवर लक्ष ठेवणे.

४) स्त्रियांना विविध उद्योगधंद्याच्या ठिकाणी होणारे आजार, शैक्षणिक समस्या, कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ व इतर समस्यांचा अभ्यास करून महिलाविषयक धोरण आखण्याऱ्यासाठी राज्य शासनास मदत करणे,सल्ला देणे आणि मार्गदर्शन करणे इ. कार्ये आयोगाला करावी लागतात.

राज्य महिला तक्रार निवारण समिती :-

काामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैगिक छळास प्रतिबंध करण्यासाठी व लैंगिक छळासंबंधी तक्रारींचे निवारण करण्यासाठी राज्य स्तरांवर राज्य महिला तक्रार निवारण समिती दिनांक १९.०५.१९९९ च्या शासन निर्णयान्वये नियुक्त करण्यात आली आहे.

निष्कर्ष :-

१) २०११ च्या जनगणनेनुसार एकुण लोकसंख्येमध्ये स्त्रियांचे प्रमाण ४८.४६ टक्के आहे. म्हणजेच एकुण लोक संख्येत स्त्रियांचे प्रमाण निम्या इतके आहे. त्याप्रमाणात प्रत्येक क्षेत्रात महिलांना अर्धा वाटा मिळणे आवश्यक आहे.

२) शासनाने महिलांच्या सर्वांगिन विकासासाठी अनेक कायदे, आयोग, विकासासंबंधी योजना व महिला विषयक धोरणे सूरू केलेली आहेत परंतू त्यांचा अजून पर्यंत पाहिजे त्या प्रमाणात प्रभाव पडलेला दिसून येत नाही.

३) शासनाने महिलासंबंधी केलेले कायदे, धोरण व योजना राबवितांना त्याची अंमलबजावणी योग्य प्रकारे करणे् आवश्यक आहे.

४) शासनाने तयार केलेले कायदे, धोरणाची व योजनांची माहिती तळागाळातील महिलांपर्यंत पोहचविण्यासाठी प्रचार व प्रसार करणे् आवश्यक आहे.

५) कायदे व योजना यांचा लाभ घेण्यासाठी महिलांना प्रोत्साहीत करणे व त्यांची मानसिकता बदलणे जरूरी आहे.

६) महिलांसबंधी कायदे, योजना व धोरणांची अंमलबजावणी करतांना पूरूषांनी स्त्रि-पूरूष समानता हे तत्त्व विचारात घेणे आवश्यक आहे

संदर्भ सूची :-

१) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१२-२०१३ :- अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग महाराष्ट्र शासन मुंबई

२) महाराष्ट्र वार्षिकी २०१२ :- युनिक ॲकॅडमी पूणे

३) योजना मासिक :-जूलै २०११

४) ओळख मानव अधिकारांची :- डॉ.सुभाष गवई, डॉ.दया पांडे